*Review Of Research*
Vol.2, Issue. 5, Feb. 2013
**ISSN:-2249-894X**
Available online at www.reviewofresearch.net

RESEARCH PAPER

# सामाजिकशास्त्रांच्या संशोधनाची आवश्यकता

***अनिल माणिकराव बैसाणे***

झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .

***सारांश :-***

संशोधन हे नवीन ज्ञानप्राप्तीसाठी शास्त्रीयपद्धतीचा अवलंब करून करण्यात येते. अज्ञात बाबींचा शोध घेवून शास्त्रीय पद्धतीने अज्ञाताची चिकित्सा केली जाते. नवीन ज्ञान प्राप्तीसाठी पद्धतशीर प्रयत्न केले जातात. सामाजिक शास्त्रातील संशोधन आणि भौतिकशास्त्रातील संशोधन यामध्ये फरक आढळून येतो. भौतिकशास्त्रातील संशोधनामध्ये प्रयोगशाळेचा आणि प्रायोगिक पद्धतीचा अवलंब केला जात असल्यामुळे भौतिकशास्त्रातील संशोधन हे वस्तुनिष्ठ रहाते. तथापि सामाजिक शास्त्रातील संशोधनामध्ये पक्षपात आणि व्यक्तिगत मतांचा प्रभाव कमी अधिक प्रमाणात आढळून येतो. परिणामतः सामाजिक संशोधन हे वस्तुनिष्ठ स्वरूपात रहात नाही.

## ***प्रास्ताविक :***

संशोधन हे वस्तुनिष्ठ स्वरूपात रहावे यासाठी संशोधकाने ज्ञान बुद्धीभ्रम, स्वार्थ आणि नैतिकता याबाबींकडे वस्तुनिष्ठपणे विशेष लक्ष दिले पाहिजे. संशोधकांच्या कोणत्याही व्यक्तिनिष्ठ गुणांचा प्रभाव संशोधन कार्यावर होणार नाही याकडे लक्ष दिले पाहिजे. भौतिकशास्त्राच्या तुलनेत सामाजिक शास्त्रामध्ये पक्षपात किंवा वैयक्तिक मतांचा प्रभाव जास्त आढळून येतो. भारतातील बिटिशकालीन समाजजीवन, भारतीय समाजाची वैशिष्ट्ये, भारतातील धर्म, रूढी–परंपरा, धार्मिक प्रभावाखाली समाज निरक्षरता, जातीविषयक बंधने, समाजरचना, संयुक्त कुटुंबपद्धतीचा ऱ्हास इत्यादी बाबींवर सामाजिक संशोधन हे थोड्याफार प्रमाणात झाले. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर नियोजनाच्या माध्यमातून भारतीयांचे आर्थिक विकास पर्व सुरू झाले. स्वातंत्र्योत्तर काळातील भारतातील अनेक समस्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठी करावी लागणारी उपाययोजना या हेतूने भारतातील सामाजिक संशोधनास दिशा प्राप्त झाली. अनेक समस्या आणि त्या समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना या दृष्टीने संशोधनाला चालना मिळाली. भारतातील सामाजिक संशोधन हे स्वातंत्र्योत्तर काळात सरकारी आणि सामाजिक संस्थांच्या माध्यमातून या दोन स्तरावरून सुरू झाले.

"सामाजिक शास्त्राच्या संदर्भात वस्तुनिष्ठ दृष्टिकोनाचे विवेचन संशोधकाने चांगल्याप्रकारे करायला हवे. कारण ज्ञान विषय हा माणूस आहे. त्याच्या कृती, त्याने निर्माण केलेले सामाजिक वास्तव, त्याचे मूलभूत स्वरूप निसर्गविज्ञानाच्या ज्ञानविषयाच्या स्वरूपापेक्षा वेगळे असल्यामुळे सामाजिक शास्त्रामधील वस्तुनिष्ठतेचा प्रश्न जास्तच गुंतागुंतीचा झालेला आहे." सामाजिक वास्तव हे मानवनिर्मित असल्याकारणाने मानवनिर्मित नसलेल्या नैसर्गिक वास्तवाच्या अभ्यासपद्धती सामाजिक शास्त्रांमध्ये उपयोगात आणणे अर्थातच शक्य नसते. नैसर्गिक वास्तवाच्या अभ्यासाप्रमाणे सामाजिक वास्तवाचा अभ्यास पूर्णपणे तटस्थ निरीक्षणातून करता येत नाही. कारण सामाजिक वास्तवाला मुळातच एक अर्थपूर्णता असते. ही अर्थपूर्णता ज्यांच्या कृतीमधून ते वास्तव आकाराला येते, त्या कृतींचा त्यांना अभिप्रेत असलेला अर्थ समजून घेतल्याशिवाय पूर्णपणे जाणून घेता येत नाही. याचा अर्थच असा की, ज्ञानेंद्रीयांना सत्य प्रतीत न झाल्यामुळे मुलाखती सर्वेक्षण, प्रश्नावली इत्यादींचा वापर सामाजिक शास्त्रांना करावा लागतो.[1] "संशोधनामध्ये संशोधक विशिष्ट उद्दिष्टे निश्चित करतो. ही उद्दिष्टे अंधविश्वासाच्या संदर्भात अज्ञानाचा नाश, सामाजिक नियंत्रण, सामाजिक समस्यांचे निराकरण, सामाजिक परिवर्तन,

राष्ट्रीय ऐक्य आणि एकात्मतेच्या संदर्भात असतील तर संशोधकाने कोणकोणत्या बाबींकडे लक्ष पुरविले पाहिजे हे संशोधकाने कार्य सुरू करण्यापूर्वी लक्षात घेतले पाहिजे. संशोधन हे अर्थशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र इत्यादी विषयातील असेल तर संशोधकाचे संशोधन कार्य अयशस्वी होण्याची शक्यता नाकरता येत नाही. संशोधकाचे संशोधन कार्य यशस्वी होण्यासाठी संशोधकाने विशेष प्रकारची काळजी घेतली पाहिजे."[2] संशोधकाने विशेष प्रकारची काळजी न घेतल्यास संशोधकाचे संशोधन कार्य अयशस्वी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. संशोधकाचे संशोधन कार्य यशस्वी होण्यासाठी संशोधकाने पुढील बाबी लक्षात घेणे जरूरीचे आहे.

1) संशोधनाचे क्षेत्र निश्चीत करणे. 2) उपलब्ध साहित्याचा अभ्यास. 3) चिकित्सक दृष्टीने विचार. 4) संशोधन विषयाशी निगडीत वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास. 5) ज्ञानाची पुनरावृत्ती करणे. 6) वैज्ञानिक कार्यपद्धतीचे अध्ययन. 7) प्रत्यक्ष माहिती गोळा करणे. 8) संशोधन उद्दिष्टातून संशोधन समस्या सोडविण्यावर भर, इत्यादी बाबी लक्षात घेणे जरूरीचे आहे.

***संशोधनाच्या व्याख्या***

1) पी. व्ही. यंग – यांच्यामते "सामाजिक संशोधन म्हणजे सामाजिक जीवनाबाबत नवीन तथ्य शोधण्यासाठी अथवा जुन्या तथ्यांचे परीक्षण करण्यासाठी त्या तथ्यांमधील अनुक्रम, परस्परसंबंध व कार्यकारण भाव याविषयी स्पष्टीकरण आणि सामान्यीकरण प्रस्थापित करण्याची एक पद्धतशीर प्रक्रिया होय."

2) मोझर – यांच्या मते "सामाजिक घटना व समस्या याबाबत नवीन ज्ञान प्राप्त व्हावे म्हणून केलेल्या क्रमबद्ध संशोधनाला सामाजिक संशोधन म्हणतात."

3) न्यू सेंच्युरी शब्दकोशानुसार – "एखाद्या विषयाचा विशेष काळजीपूर्वक शोध घेणे म्हणजे संशोधन होय. नवीन तत्त्व किंवा नवीन बाब शोधून काढण्यासाठी सातत्याने काळजीपूर्वक केलेली चिकित्सा म्हणजे संशोधन होय."

"सामाजिकशास्त्रांमधील शुद्ध विज्ञानातील संशोधन हे शास्त्रीय संशोधन समजले जाते. सामाजिकशास्त्र आणि संशोधनामध्ये फ्रान्सचे सामाजिकशास्त्राचे विचारवंत ऑगस्त काँत (1798–1857), फ्रान्सचे समाजशास्त्रज्ञ इमाईल दरखीम (1858–1917), जर्मन समाजशास्त्रज्ञ मॅक्सवेबर (1864–1920), इटलीचे समाजशास्त्रज्ञ विलफ्रेडो पॅरोटो (1848–1923) आणि समाजशास्त्रज्ञ बोगार्डस यांनी अतुलनीय योगदान दिले आहे."[4]

सामाजिकशास्त्रांमधील संशोधन दोन मार्गांनी केले जाते. असा सर्वसामान्य समज आहे. प्राथमिक स्त्रोतांमधून मिळालेली तथ्यसंकलन संशोधक स्वतः गोळा करतो. तर दुय्यम स्त्रोतांच्या अध्ययनातून उपलब्ध लिखित तथ्यसंकलन, प्रकाशित व अप्रकाशित माहितीचे संकलन व विश्लेषणाद्वारे केलेले संशोधन यामध्ये जनगणना व इतर सरकारी कागदपत्रे, अहवाल, पत्रे–रोजनीशी, आत्मचरित्रे – इतर चरित्रे असे साहित्य जमविले जाते, अभ्यासले जाते. याचा प्रमुख उद्देश म्हणजे हे स्त्रोत इतर कोणीतरी निर्माण केलेले, प्रसारित–अप्रकाशित केलेले असतात. सामाजिकशास्त्रे या शाखेत संशोधनाच्या पद्धती व तंत्रे पदवी अभ्यासक्रमात शिकविली जातात. इतर सामाजिकशास्त्रांपेक्षा जास्त प्रमाणात पद्धतीशास्त्रांविषयीची सैद्धांतिक जाणीव आढळून येते. अभ्यासविषयाची ओळख, सैद्धांतिक चौकट, पद्धतीशास्त्र आणि तथ्यसंकलनाचे तंत्र यातील संबंध जाणीवपूर्वक उलगडून दाखविले तरच सामाजिक तंत्राची ओळख होईल.

"संशोधन करतांना संशोधन म्हणजे काय ?संशोधनाच्या व्याख्या, संशोधनाचे उद्देश, संशोधनातील पद्धती, संशेधन आराखडा, संशोधनाचे प्रकार, स्वरूप, संशोधनातील गृहीतके, माहितीचे संकलन, विश्लेषण आणि अहवाललेखन याबाबात संशोधकास माहिती नसेल तर संशोधनाचे कार्य भरकटल्यासारखे होते.संशोधनामध्ये संशोधकास सत्याबद्दल आवड असली पाहिजे आणि संशोधनाचे निष्कर्ष हे निपक्षपातीपणे स्वीकारण्याची मानसिक तयारी असली पाहिजे. कारण सत्याबद्दल आस्था नसेल आणि वस्तुनिष्ठतेचा अभाव संशोधकांमध्ये आढळून आल्यास संशोधकाचे कार्य हे संशोधन कार्य शीर्षकापर्यंत विचारात घेता येत नाही."[5]

"संशोधन करतांना संशोधनाचा विषय कोणता आहे हे संशोधकाने सातत्याने लक्षात ठेवले पाहिजे. संशोधकाचे उद्देश निश्चित केल्यानंतर संशोधन कार्य हे उद्दिष्टानुरूप चालणे संशोधनाच्या उद्दिष्टांमध्ये नसलेल्या बाबींच्या संदर्भात माहितीचे संकलन न करता मुख्य हेतूला उपयुक्त ठरणारी माहितीच संकलित करण्यावर भर दिला पाहिजे. संशोधकाने जी उद्दिष्टे पूर्ण निश्चित केलेली नाहीत अशा विषयाच्या संदर्भातील माहितीच्या संकलनाकडे लक्ष दिल्यास संशोधनाचे कार्य भरकटण्याची शक्यता राहते. संशोधनाचा विषय आणि उद्दिष्टांशी संशोधक एकरूप असला पाहिजे."[6]

सामाजिक संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची उपकल्पना, संशोधनासाठी लागणाऱ्या माहितीचे संकलन, संशोधनासाठी उपलब्ध झालेल्या माहितीचे सारणीयन, संख्याशास्त्रीय तंत्र व पद्धतीद्वारे विश्लेषण, प्राप्त होणारे निष्कर्ष, निष्कर्षांची संशोधन उद्दिष्टांशी तुलना गृहीतकृत्यांचे परिक्षण आणि निष्कर्ष इत्यादी बाबी संशोधन प्रक्रियेमध्ये अंतर्भूत आहेत. संशोधकाने संशोधन करतांना वैज्ञानिक कार्य पद्धतीचा अवलंब केला पाहिजे. संशोधकाने वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करतांना संशोधनाचा विषय, संशोधनाच्या पद्धती, प्राप्त माहितीचे वर्गीकरण, सैद्धांतिक संकल्पनांची मांडणी, सामान्य स्वरूपातील निष्कर्षे आणि गृहीतके किंवा उपकल्पना यांचा योग्य पद्धतीने अवलंब केला पाहिजे. सामाजिक घटनांचा अभ्यास, कार्यकारणसंबंधचा शोध, वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग, नवीन तथ्यांचा शोध, जुन्या माहितीचे निरीक्षण आणि सांख्यिकीय विश्लेषण या बाबी सामाजिक संशोधनाच्या उद्दिष्टांशी संबंधित आहेत.

रोजच्या जगण्यातून माणूस सैद्धांतिक नव्हे तर व्यावहारिक पातळीवर बरेच काही शिकत असतो. या पातळीवर स्वीकारलेले वेगवेगळे उपक्रम उद्दिष्ट्ये यांच्या संदर्भ चौकटीत केल्या जाणाऱ्या कृती या महत्त्वाच्या असतात. या उद्दिष्टांच्या संदर्भात व्यक्ती कृतींना (Action) अर्थ देत असतो. कारण कर्त्याची क्रीया ही पार्सन्सने सांगितल्याप्रमाणे संदर्भ चौकटीतच होते हे महत्त्वाचे आहे. कोणतेही उद्दिष्टे उपक्रम करतांना व्यक्तीला इतर व्यक्तींच्या कृतींची दखल घ्यावीच लागते. "प्रत्येक व्यक्तीच्या अनुभवविश्वाच्या वैशिष्ट्यांमुळे या चौकटीला आशय, अर्थ लावण्याची पद्धत, त्याची स्पष्टता या वेगवेगळ्या असल्यातरी या संदर्भचौकटीत अनेक व्यक्तींना समान असणारे घटक असतातच. यामुळे बहुतांशी सामाजिक अनुभवांचे सामान्यीकरण करणे, त्याचे प्रकटीकरण करणे शक्य होते. त्यामुळेच व्यक्तीनिष्ठ अर्थ, आंतरव्यक्तीनिष्ठ पातळीवर समजून घेणे शक्य होते. व्यक्तीच्या समाजजीवनाचा आधार म्हणजे एकसारख्या अनुभवातून निर्माण होणारी सामान्य जाणीव अथवा रोजच्या जगण्यातील सहज प्रवृत्ती होय."[7]

"सामाजिकशास्त्रांची संशोधनाची दुसरी पद्धत म्हणजे क्षेत्रीय अभ्यासपद्धती होय. यामध्ये प्रत्यक्ष ठिकाणी संशेधक स्वतः अभ्यास विषयाशी संबंधित तथ्यांचे संकलन करीत असते. याला प्राथमिक स्रोतांचे अध्ययन असे म्हणतात. नमुना निवड झाल्यानंतर संशोधक निरीक्षण, मुलाखत, सर्वेक्षण यापैकी कोणत्याही पद्धतींचा वापर करून संशोधक स्वतः माहिती गोळा करून अध्ययन करतो. सामाजिक शास्त्रांमध्ये सैद्धांतिक पातळीवर दोन विचारप्रणाली पद्धतीशास्त्राला व वस्तुनिष्ठतेच्या आकलनाला विशेष योगदान करतात. व्यक्तीला होणारी जाणीव नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी घटकांशी संबंधित असते. जाणिवा आणि त्यांचा संबंध, विषय हे नेहमीच अपरिहार्यपणे एकमेकांशी निगडीत असतात. वस्तुनिष्ठ ज्ञान होण्यासाठी फक्त ज्ञान विषयाचे स्वरूप समजणे पुरेसे नाही. त्यासाठी व्यक्तीला सामाजिक आंतरक्रियातून ज्ञानसाधना होत असते. थोडक्यात आंतरव्यक्ती निष्ठतेच्या आधारावरच वस्तुनिष्ठ सामाजिकशास्त्रे उभी राहतात."[8] त्यामुळेच सामाजिक शास्त्राचा अभ्यासक व्यावहारिक पातळीवरून तटस्थ निरीक्षणकर्त्याच्या सैद्धांतिक पातळीवर जातो. वैयक्तिक अनुभव, त्यानुसार निर्माण होणारी संदर्भ चौकट, रचनेत वस्तुनिष्ठ आकलन असणे गरजेचे असते. थोडक्यात सामाजिकशास्त्रांमधील अर्थाचे मध्यवर्ती स्थान, अर्थाचा व्यक्तिनिष्ठ स्रोत आणि त्याचवेळी अर्थाला नेहमीच असणारा आंतरव्यक्तीनिष्ठतेचा पाया हे सर्व काही तथ्य संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत.

सामाजिक संशोधनाचा हेतू किंवा उद्देश, मानवी समाज, मानवाचे समाजजीवन, त्यावर प्रभाव टाकणारे घटक आणि परिणाम यांच्याशी संबंधित असतो. सामाजिक घटना आणि समस्या या संदर्भातील नवीन स्थान प्राप्त व्हावे म्हणून सामाजिक संशोधन केले जाते. सामाजिक संशोधनाद्वारे सामाजिक जीवनाबाबत नवीन माहिती शोधण्यात येते आणि जुन्या माहितीचे परीक्षण केले जाते.

### *निष्कर्ष*

संशोधन कार्याच्या विषयात समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अनेक ठिकाणी विवेचन करण्यात आले आहे. परंतु सर्व विषयातील संशोधन कार्याबाबत एक सामान्य दृष्टिकोन देणाऱ्या माहितीची संपूर्ण जगात कमतरता आहे. ज्यात संशोधन कार्याशी संबंधित सर्व प्रकारच्या प्रक्रियांचे विस्तृत विवेचन सरळ भाषेत अपेक्षित आहे. सामाजिक संशोधन सामाजिक घटकांशी आणि विषयांशी संबंधित असते. तर शास्त्रीय संशोधनामध्ये प्रयोगशाळेचा उपयोग मोठ्याप्रमाणात होतो. पायाभूत संशोधन आणि व्यवहारोपयोगी संशोधामध्येच सामाजिक संशोधन समाविष्ट आहे. संशोधकाने संशोधन विषयाच्या साहित्याचे वाचन विस्तृत स्वरूपात केले पाहिजे. वस्तुनिष्ठतेचा अभाव संशोधकांमध्ये आढळून आल्यास संशोधकाचे कार्य हे संशोधन कार्य या शीर्षकापर्यंत विचारात घेता येत नाही. संशोधकाच्या अंगी चिकित्सकवृत्ती आणि बौद्धिकता हे गुण अत्यंत महत्त्वाचे आहेत. सामाजिक घटनांचा अभ्यास, कार्यकारण संबंधांचा शोध, वैज्ञानिक पद्धतीचा उपयोग, नवीन तथ्यांचा शोध, जुन्या माहितीचे निरीक्षण आणि सांख्यिकीय विश्लेषण याबाबी सामाजिक संशोधनाच्या उद्दिष्टांशी संबंधित आहेत.

### *संदर्भग्रंथ :–*


1. आगलावे प्रदीप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, श्री. विद्या प्रकाशन, पुणे, 2000 पृ. 78–79.
2.घाटोळे रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन – तत्त्वे व पद्धती, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, 2009, पृ. 51–52.
3.बोधनकर सुधीर व अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर, 2003, पृ. 104
4. डॉ. सातभाई श्रीनिवास, इतिहास लेखनशास्त्र, विद्याबुक्स पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2011, पृ. 78.
5. पाटील वा. भा., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, 2010, पृ. 14–15.
6. गाठाळ एस. एस., इतिहासलेखन शास्त्र कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2011, पृ. 22:23.
7.नाडगोंडे गुरूनाथ, सामाजिक संशोधनपद्धती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 1986, पृ. 52–53.
8.कुंभोजकर जी. व्ही., संशोधनपद्धती व संख्याशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2002, पृ.38–39.





***अनिल माणिकराव बैसाणे***
माजी इतिहास विभाग प्रमुख, झेड् बी. पाटील कॉलेज, देवपूर, धुळे .